मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत



छळणाऱ्यापासून धर्मोपदेशकापर्यंत

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
Alastair Paterson
रूपान्तरकार: Ruth Klassen
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2022 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



प्रारंभीच्या मंडळीत
परमेश्वराने त्याच्या
लोकांच्याकर्वी महान
कार्य केले. फिलिप्प
नावाचा एक मनुष्य होता,

तो गर्दीने भरलेल्या
यरुशलेमेत लोकांना येशूची
सुवार्ता सांगण्यास व्यस्त होता.
परंतू देवाने त्याला रानात
पाठविले. का ?


कुशी (एथिओपियन) लोकांची
राणी कांदके, हिचा मोठा अधिकारी
त्या रानाच्या वाटेने प्रवास करित
होता, हे देवाला माहित होते. तो
त्याच्या घरि परतत असतांना वाटेत
एक विशेष पुस्तक वाचित होता. ते
पुस्तक कोणते असेल; कोणी
ओळखू शकेल का?

जेंव्हा
फिलिप्पने
देवाचे आज्ञापालन
केले, तेंव्हा देवाने त्याला
त्या अधिकाऱ्याजवळ नेले;
तो ते पुस्तक न समजताच वाचत
होता. त्या अधिकाऱ्याने फिलिप्पला
त्याच्याजवळ येऊन बसण्यास सांगितले.

"याचा अर्थ काय आहे?" असे त्या अधिकाऱ्याने फिलिप्पला विचारले. तो रथ त्या रानाच्या रस्त्यावरुन झटके देत पुढे चालला असता, फिलिप्पाने बोलायला सुरवात केली व तो वाचत असलेल्या शास्त्राभागापासून सुरवात करुन त्याने त्याला येशूची सुवार्ता सांगितली.



येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे,
या पवित्र शास्त्रातील संदेशावर आफ्रिकन
अधिकाऱ्याने लवकरच विश्वास ठेवला. ते
पाणवठ्याजवळ आले तेंव्हा तो अधिकारी म्हणाला,
"बाप्तिस्मा घेण्यास मला काय हरकत आहे?"

मग फिलिप्पने म्हटले, "जर तूं पूर्ण अंतःकरणाने विश्वास करतो तर तुला बाप्तिस्मा घेण्यास काही हरकत नाही." त्यावर तो अधिकारी म्हणाला की, "येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे यावर मि विश्वास करतो." फिलिप्प त्याला घेऊन पाण्यात उतरला व त्याने त्याला बाप्तिस्मा दिला.



जेंव्हा ते पाण्यातून वर आले, तेंव्हा प्रभूचा आत्मा फिलिप्पाला घेऊन गेला, म्हणून पुन्हा तो त्या आफ्रिकन अधिकाऱ्याच्या दृष्टिस पडला नाही. एथिओपियाला तो आनंद करित परतला.



परंतू काही लोक ख्रिस्ती लोकांचा द्वेष करित होते. फिलिप्पचा एक मित्र, स्तेफन याला क्रोधाविष्ट जमावाने दगडमार करुन जिवे मारले होते कारण त्याने येशूविषयी दुसऱ्यांना सांगू नये अशी त्यांची इच्छा होती. तार्सस गावातील शौल नावाच्या एका माणासाने स्तेफनला जिवे मारण्यास मदत केली होती. शौल सर्व ख्रिस्ती लोकांचा छळ करित होता.

शौल, ख्रिस्ती लोकांना धमक्या देणे व त्यांना जिवे मारणे ह्यांविषयीचे फूत्कार टाकीत होता. तो प्रमुख याजकाकडे गेला आणि जे स्त्री-पुरुष येशूचे अनुकरण करतात त्यांना धरुन अटक करण्याचे अधिकार पत्र मागितले.



बिच्चारा तार्ससकर
शौल ! तो देवाच्या
लोकांना त्रास देत
आहे म्हणजे तो खुद्द
येशूलाच त्रास देत
आहे हे त्याला माहित
नव्हते. देवाने शौलाला
थांबवणे आवश्यक
होते. परंतू कसे?

देवाने शौलाला "पकडले" !
जेंव्हा शौल दिमिष्क शहराच्या
वाटेवर होता, देवाने स्वर्गातून
मोठा प्रकाश पाडला. शौल
त्या प्रकाशाने जमिनिवर
पडला. मग त्याने एक
वाणी ऐकली.



तेंव्हा शौल मोठ्याने म्हणाला, "प्रभो, तूं कोण आहेस?"
त्याने म्हटले, "ज्या येशूचा तूं छळ करितोस तोच मी
आहे." थरथर कांपत, विस्मयीत झालेल्या शौलाने
विचारले, "प्रभू, आता मी करावे अशी तुझी इच्छा आहे?"
आणि प्रभूने त्याला म्हटले, "तर आता ऊठ व नगरांत जा,
म्हणजे तूं काय करावयाचे आहे हे तुला सांगण्यात येईल."

शौलासंगती असलेल्या माणसांनी वाणी ऐकली, परंतू त्यांना काही दिसले नाही. शौल जमिनीवरुन उठला व त्याला कळले की तो आंधळा बनलेला होता ! ते त्याला घेऊन दिमिष्कात गेले.



तेथे शौल तिन दिवस पर्यंत जेवण पाणी
न घेता आंधळा बनून राहिला. कदाचित
त्याने ज्या देवाने त्याला दिमिष्काच्या
रस्त्यावर दर्शन दिले त्या प्रभू
येशूची प्रार्थना करण्यात त्याचा
वेळ घालवला असावा.

देवाने सर्वकाही योजून ठेवले होते.
दिमिष्कांत हनन्या नावाचा कोणी एक
शिष्य होता. देवाने त्याला शौलाची
मदत करण्यासाठी पाठविले. हनन्या
सुरवातीला घाबरला होता, परंतू
त्याने देवाचे आज्ञापलन केले.
जेंव्हा हनन्याने शौलावर हात
ठेवले तेंव्हा त्याचे अंधत्व
निघून गेले आणि त्याला
पुन्हा दृष्टि आली,
आणि शौल पवित्र
आत्म्याने भरला.





शौलाचा बाप्तिस्मा झाला. आणि मग त्याने उठून जेवण केले. आणि जेंव्हा त्यांने अन्न खाल्ले तेंव्हा त्याला शक्ति आली. शौलाला शक्तिची गरज होती. कारण त्याला काहीतरी फार महत्वाचे कार्य करावयाचे होते.

लगेच सभास्थानात जाऊन शौलाने येशू
ख्रिस्त हाच देवाचा पुत्र आहे अशी येशू
ख्रिस्ताविषयी घोषणा केली. तेंव्हा ते
ऐकणाऱ्या सर्वांना आश्चर्य वाटले आणि
ते म्हणाले, "ख्रिस्ती लोकांचा नाश
करणारा तो हाच नव्हे काय?" आणि काही
लोकांनी पौलाला
जिवे मारण्याचा
बेत केला.





शौलाचे नविन बनलेले
शत्रूं शहराच्या मुख्य दारावर लक्ष ठेवून
राहिले यासाठी की जर शौल येथून गेला
तर त्याला जिवे मारावे. परंतू शौलाच्या
नविन मित्रांनी म्हणजे खिस्ती
विश्वासणाऱ्यांनी त्याला रात्रीचे घेऊन
गावकुसावरुन एका मोठ्या पाटीत
बसवून खाली सोडले. त्या दिवसापासून.
जो खिस्ती विश्वासणाऱ्यांचा छळ करणारा
शौल होता त्याने, विश्वासूपणे त्याच्या
प्रभूचे म्हणजे येशू खिस्ताचे अनुकरण केले.

छळणाऱ्यापासून धर्मोपदेशकापर्यंत

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

प्रेषित ८–९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०


समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगाः
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16